# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०१/२०२५ (बुधवार)

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद वाहनासह एकूण १ कोटी ८९ लाख ४१ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त पोलीस स्टेशन बुटीबोरी यांची धडक कारवाई.

दिनांक २९/०१/२०२५ रोजी बुटीबोरी येथील स्टॉप पोलीस ठाणे बुटीबोरी हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, उमरेड कडून बुटीबोरी कडे अवैधरीत्या विनापरवाना रेती टिप्पर ट्रक मध्ये लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा देवळीगुजर गावा जवळ नाकाबंदी करीत असतांना **१) टिप्पर वाहन क्र. एम एच ४० ऐ के ५९७० चा चालक नामे कृष्णा हिराचंद महाजन वय ३३ वर्ष, रा.नवेगाव (पालेपाट) ता. पवनी जिल्हा भंडारा २) टिप्पर वाहन क्र एम एच ४० बी एफ ४३११ चा चालक नामे प्रदिप धोंडबा कैकाडे वय ३७ वर्ष रा.तास ता भिवापुर जि नागपुर ३) टिप्पर वाहन क्र एम एच ३६ ऐऐ ३७५२ चा चालक नामे तुषार ज्ञानेश्वर चुटे वय २१ वर्ष सिर्सी ता उमरेड जि नागपुर ४) टिप्पर वाहन क्र. एमएच ४० बी एल ५६०४ चा चालक नामे रंजित हिरामन शहारे वय ३८ वर्ष रा तांबेखणी ता उमरेड जि नागपुर ५) टिप्पर वाहन क्र.एम एच ४० सीटी ५४४६चा चालक नामे संदिप ज्ञानेश्वर वावरे वय ३६ वर्ष रा तास ता भिवापुर जि नागपुर** यास थांबवून पाहणी केली असता सदर वरील पाच ही वाहनात एकुण अंदाजे ३३ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वरील वाहन चालकांना त्याचे ताब्यातील टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने वरील नमुद वाहन चालक व वाहन मालक , **वाहन नंबर ०१,०२,०४ चे मालक युवराज उर्फ नितेश यशवंत जुनघरे,वाहन नंबर ०३ चे मालक संदीप वाघे,वाहन नंबर ०५ चे मालक पलाश ओमप्रकाश रगताटे** असल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीच्या ताब्यातील वरील पाच टिप्पर वाहने किंमती अंदाजे १,८६,००,०००/— रू. त्यामध्ये एकुन अंदाजे ३३ ब्रास रेती किमती ३,४१,०००/— रू. असा एकुण **१,८९,४१,०००/— रुपये चा मुद्देमाल जप्त केला.**

करून वरील पाचही चालक आरोपी व मालक आरोपीतांच्या विरुद्ध पोलीस ठाणे बुटीबोरी येथे कलम ३०३(२),३(५) भारतीय न्याय संहिता सहकलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९९६, सहकलम ४,२१ खानी

आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये ५ वेगवेगळे गुन्हे नोंद करण्यात आली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## उपविभागिय पोलीस अधिकारी ,कार्यालय कन्हान यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान**:— दिनांक २८/१/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उप विभागीय पोलीस अधीकारी कार्यालय कन्हान हे कन्हान परीसरात पेट्रोंलिंग करीत असतांनी नागपुर जबलपूर रोड वर टेकाडी शिवारात एक १२ चक्का टाटा टिप्पर क्र. एम एच ४० सी डब्लु १७१७ हा मनसर कडून नागपूर कडे येंताना दिसला त्यास थांबवून टाटा टिप्पर ची पाहनी केली असता सदर टिप्पर मध्ये अंदाजे ०९ ब्रास रेती मीळून आली. टिप्पर चालक आरोपी नामे सादाब हयात पठान वय २९ रा. देवलापार ता. रामटेक याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. टिप्पर क्र. एम एच ४० सी डब्लु १७१७ हे त्याच्या मालकीचे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ९ ब्रास रेती आणि २) टाटा टिप्पर क्र. एम एच ४० सी डब्लु १७१७ असा एकुण **५०,२७,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**टिप्पर चालक मालक आरोपी नामे सादाब हयात पठान वय २९ रा. देवलापार ता. रामटेक याच्या विरूध्द पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (७), ४८ (८) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे.


GOODS
CARRIER
SIGNA
JAIKA
TATA
Ferrari
MH 40
CW 1717
TEA STALL